THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 4TH JUNE 1896.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### सन १८७२ चा शेंबा व गर यांबाबदचा आक्ट सुधारण्याविषयींच्या आक्टाचा मसुदा.

ज्याअर्थी सन १८७९ चा शेंबा व गर यांबाबदचा आक्ट जास्त सुधारणें योग्य आहे, त्याअर्थी यावरून खालीलप्रमाणें ठरविण्यांत येत आहे :—

१. सन १८८६ च्या २४ व्या आक्टावरून सुधारलेल्यां सदरहू आक्टाच्या १ ल्या कलमांतील "मद्रासचे गव्हर्नर इन् कौन्सिल यांच्या व बंगालचे लेफ्टेनेंट गव्हर्नर यांच्या वहिवाटींतील मुलूक खेरीज करून" हे शब्द रद्द केले आहेत. — सन १८७९ चा आक्ट २०, याच्या १ ल्या कलमाची सुधारणा.

२. सदरहू आक्टाचीं कलमें ७ व ८ यांमध्यें "सर्जन" हा शब्द आला असेल त्या दरेक ठिकाणीं त्याबद्दल "प्राक्टिशनर" हा शब्द दाखल केला पाहिजे. — सन १८७९ चा आक्ट २०, याच्या ७ व्या व ८ व्या कलमाची सुधारणा.

### हेतु व कारणें यांचें निरूपण.

सन १८७९ चा शेंबा व गर यांबाबदचा आक्ट सगळ्या ब्रिटिश हिंदुस्थानास लागू करण्याचें ठरविलें आहे, आणि यासाठीं, सन १८८६ च्या २४ व्या आक्टावरून सुधारलेल्या त्या आक्टाच्या १ ल्या कलमाच्या ज्या भागावरून बंगाल व मद्रास हे प्रांत त्याच्या अमलांतून वगळले आहेत तो भाग या मसुद्याच्या १ ल्या कलमावरून रद्द केला आहे. एवढ्यावरूनच तो आक्ट या प्रांतांमध्यें अमलांत येतो असें नाहीं, कारण याखेरीज आणखी, संबंध असलेल्या स्थानिक सरकाराच्या वहिवाटींतील मुलुकांच्या कोणत्याही भागांत त्याचे ठराव अमलांत आंणण्याला अशा स्थानिक सरकारानें ३ ऱ्या कलमाअन्वयें जाहिरनामा काढणें जरूर आहे.

२. रॉयल कॉलेज आफ् व्हेटिरिनरी सर्जन्स याचे सभासद व फेलो यांसच फक्त "व्हेटिरिनरी सर्जन" ही संज्ञा असावी असा इरादा, ४४ व ४५ व्हिक्टोरिया, बाब ६२, याअन्वयें दिसत असून, सन १८७९ चा शेंबा व गर यांबाबदचा आक्ट याच्या ७ व्या व ८ व्या कलमांत त्या संज्ञेचा उपयोग केल्यानें त्यांच्या ठरावांअन्वयें इंग्लंड देशाच्या सदरहू स्टाटूटखालीं येणाऱ्या मनुष्यांखेरीज इतरांस "व्हेटिरिनरी सर्जन" नेमतां येईल अशी हरकत सदरहू सभासद व फेलो यांच्या वतीनें घेण्यांत आलेली आहे. सबब ही संधि साधून हिंदुस्थानच्या आक्टांत "सर्जन" या शब्दाबद्दल "प्राक्टिशनर" हा शब्द दाखल केला आहे.

तारीख २३ माहे मार्च सन १८९६.

जे. वुडबर्न.

(True translation.)
M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

## रेव्हिन्यू डिपार्टमेंट.

मुकाम जंजिरे, मुंबई, तारीख १३ माहे मे सन १८९६.

सन १८९० चें मुंबई सरकारी गॅझेट, भाग १, पृष्ठें ३४१ ते ३४४ ह्यांवर आणि सन १८९३ चें मुंबई सरकारी गॅझेट, भाग १, पृष्ठ ६१३ ते ६१८ ह्यांवर प्रसिद्ध केलेले जाहिरनामे नंबर २७४३ व ५०१८, तारखा अनुक्रमें २२ एप्रिल १८९० व ११ जुलई १८९३.

नंबर ३८१०.—सन १८८६ चा पिट्रोलियम ॲक्ट, कलम ८, ह्याअन्वयें केलेल्या आणि रकान्यांत निर्दिष्ट केलेल्या जाहिरनाम्यांमध्यें प्रसिद्ध केलेल्या कानूंपैकीं कानू १६ व १८ ह्यांत फेरफार करण्यासाठीं जी कानू सदर्हू कलमाअन्वयें करण्याचें योजिलें आहे तिचा खालीं लिहिलेला मसुदा, त्या कानूंशीं ज्या मनुष्यांचा संबंध असण्याचा संभव असेल त्यांच्या माहितीसाठीं प्रसिद्ध केला आहे; आणि ह्यावरून असें जाहिर करण्यांत येत आहे कीं, ह्या जाहिरनाम्याच्या तारिखेपासून एका महिन्यानें त्या मसुद्याचा विचार करण्यांत येईल.—

पिट्रोलियम मोठ्या प्रमाणानें आयात केलेलें असेल तेव्हां, तें, एक होज व एक घडींव लोखंडाची नळी ह्यांच्या साह्यानें तारवांतून काढून सांठवणाच्या टांक्यांत पंप केलें पाहिजे. हवा व यंत्रें वगैरे अनुकूळ असल्यास, सदर्हू तेल काढण्याचें काम, संपेपर्यंत, रात्रंदिवस एकसारखें चालू ठेविलें पाहिजे. रात्रीं काम चालत असेल तेव्हां फक्त विजेच्या दिव्यांचाच उपयोग केला पाहिजे, आणि तारवांतलें तेल काढण्याचें काम संपलें ह्मणजे, सांठवणाच्या टांक्यांस लावलेली नळी, किनाऱ्यावरील एका जादा पंपाच्या योगानें ताबडतोब रिकामी केली पाहिजे. पिट्रोलियम काढण्याचें काम कोणत्याही कारणानें कोणत्याही वेळीं बंद पडलें तर, सदर्हू नळींत जें तेल राहिलेलें असेल तें बाहेर पडूं नये ह्मणून एका व्हाल्वाच्या योगानें पक्का बंदोबस्त केला पाहिजे.

आलीजाह गव्हर्नर साहेब बहादुर इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून,

(सही) जे. मॉंटीथ,
ॲक्टिंग सेक्रेटरी निसबत सरकार.

(True translation)
M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.